**खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे**

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

**राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे**

# प्रसिद्धी विभाग

# शैक्षणिक वर्ष : २०२४ – २५

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ – सुवर्णमहोत्सव

**पुण्यनगरी**

## खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचा आज सुवर्णमहोत्सव

**उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी घेतला आढावा**

राजगुरुनगर : प्रतिनिधी

खेड तालुक्याच्या शैक्षणिक जडणघडणीत मोलाचे योगदान देणाऱ्या खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या स्थापनेस नुकतीच ५० वर्ष पूर्ण झाली. यानिमित्त हुतात्मा राजगुरु महाविद्यालय येथे अभिवादन कार्यक्रमासह, ॲड. सर्जेराव पानसरे यांचे व्याख्यान आणि रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

हुतात्मा राजगुरु महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे संस्थेच्या सुवर्णमहोत्सवाचा आढावा घेतला यावेळी ते म्हणाले की, या संस्थेची मूळ संकल्पना संस्थापक अध्यक्ष, माजी आमदार, साहेबरावजी बुट्टेपाटील यांची समाजात सरस्वती पूत्र म्हणून त्यांचा नावलौकिक होता. त्यांना माजी आमदार स्व. साहेबरावजी सातकर यांची तेवढीच खंबीर साथ लाभली. ग्रामीण भागात शिक्षण प्रसाराचे स्वप्न उराशी बाळगून ते प्रत्यक्ष कृतीत उतरवण्याचा निर्धार त्यांनी केला. यातूनच १९७८ साली हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाची स्थापना झाली. गेली पाच दशके तालुक्यातील डोंगरी आदिवासी भागातील हजारो विद्यार्थ्यांना शैक्षणिक व्यासपीठ उपलब्ध करून दिल्यामुळे त्यांना यशस्वी जीवन जगण्याची संधी मिळाली आहे. संस्थेच्या या संपूर्ण प्रवासात लोकनेते पवार साहेबांचा आशीर्वाद, प्रेम, सहकार्य यामुळे या संस्थेचा सातत्याने उत्कर्ष झाला आहे.

आज संस्थेने विद्यार्थ्यांची वाढती संख्या लक्षात घेऊन साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालय नव्याने सुरु केले आहे. तसेच ग्रामीण भागातील कुडे बु.येथे शिंगेश्वर माध्यमिक विद्यालय कार्यरत आहे. संस्थेच्या या तीनही शाखांत सुमारे ८ हजाराहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. यात विद्यार्थिनींचे प्रमाण अधिक आहे. या महाविद्यालयातून अकरावी पासून पदवी पदव्युत्तर पर्यंत, बीबीए, बीसीए, बीसीएस हे व्यावसायिक अभ्यासक्रम आणि मराठी, रसायनशास्त्र आणि राज्यशास्त्र या विषयांचे पीएच.डी. संशोधनाचे गुणवत्ताप्रधान शिक्षण दिले जाते. गेली २३ वर्ष संस्थेच्या वतीने सुरु असणारी 'साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमाला' हा या संस्थेचा सर्वात महत्त्वाचा उपक्रम आहे.

संस्थेत विकसित झालेली कार्यसंस्कृती, सर्व सभासदांचे प्रोत्साहन, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य आणि संस्थाप्रमुखांनी घेतलेली कायम पालकत्वाची भूमिका यामुळे संस्थेची प्रगती चढत्या क्रमाने सुरु आहे. संस्थेचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांच्यासारखे संयत व प्रागतिक विचारांचे नेतृत्व संस्थेस लाभले आहे. त्यांना तितकीच मोलाची साथ उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर आणि सर्व संचालक मंडळाची सातत्याने मिळत आहे. त्यामुळे त्यांच्या नेतृत्वाखाली संस्था आणखी यशस्वीपणे पुढे वाटचाल करत राहील अशी माहिती उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी दिली.

Pimpri Chinchwad Edition
Jan 03, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख